'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E-Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.625, Special Issue 235 (D) : CBCSD 2020 | February-2020
Peer Reviewed Journal

# सार्वजनिक धोरणाव्दारे कृषी क्षेत्राचा शाश्वत विकास

प्रा.डॉ.शरद रंगनाथ दरंदले
असोसिएट प्रोफेसर,वाणिज्य विभाग,
आर्टस्,कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज सोनई
ता.नेवासा जि.अहमदनगर

प्रास्ताविक :

आजचे कृषी क्षेत्र शेतक-यांनी शेतीचे तंत्र सुधारण्यासाठी आणि त्यांची उपजिवीका तसेच उत्पन्नाला सहारा देण्यासाठी योजलेल्या अनेक शाश्वत योजना आहेत. सरकार कृषी विस्ताराची काळजी घेते आणि आदर्श विकासासाठी नेहमीच तंत्रज्ञानाचा प्रसार आणि कृषी विषयी जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करते.

देशातील कृषी क्षेत्राच्या उत्पादन वाढीसाठी आणि विकासासाठी पंचवार्षिक योजनांच्या व्यतिरिक्त अनेक कृषी विकास योजना केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यादवारे राबविल्या गेल्या. या सर्व योजनांच्या आधारे भारताचे कृषीविषयक सार्वजनिक धोरण स्पष्ट होताना दिसते. खालील सार्वजनिक धोरणाव्दारे कृषी क्षेत्राचा शाश्वत विकास होत आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१.कृषी क्षेत्रासाठी सार्वजनिक धोरणाव्दारे विविध योजना राबविल्या जात आहे.

२.सार्वजनिक धोरणाव्दारे कृषी क्षेत्राचा शाश्वत विकास होत आहे.

**संशोधन पध्दती :**

परंपरागत मार्ग - विविध संदर्भ ग्रंथ,मासिके,शासकीय प्रकाशने यातून माहिती मिळविलेली आहे.

**कृषी क्षेत्राचा शाश्वत विकासः**

सार्वजनिक धोरणाव्दारे कृषी क्षेत्राचा शाश्वत विकास होण्यासाठी पुढील योजना केंद्र सरकार व राज्य सरकार राबवित आहे.

**१. पीक कर्ज योजना :**

सर्वप्रथम ही योजना भारतात 1950 साली तत्कालीन मुंबई राज्यात लागू केली गेली होती व त्श नंतर गोरवाला समिती आणि मेहता समितीने या योजनेची शिफारस केल्यावर सर्व राज्यांसाठी लागू केली गेली. या योजनेत कर्ज मागणारा स्वतः जमीन कसतो,तसेच त्याला असणारी कर्जाची आवश्यकता आणि कर्जाची परतफेडीची हमी या घटकांना विचारात घेउन कर्ज दिले जाते. या योजनेत दिले जाणारे कर्ज हे रोख अथवा वस्तूरूपानेही,कृषी आदानांच्या स्वरूपात दिले जाते. जर शेतक-याने सुधारीत तंत्राने लागवड करण्याचे ठरविले तर त्याला जास्तीच्या खर्चाची रक्कम रोख स्वरूपात सुध्दा कर्ज म्हणुन दिले जाते. या योजनेत रोख कर्ज, वस्तूरूप कर्ज, सुधारित लागवड, सहकारी विक्री आणि शेतक-याची उपभोगाची गरज या सर्व मुददयांचा विचार करुन कर्ज दिले जाते.

**२. हरित क्रांती : (Green Revolution)**

भारत सरकारने 1960 पासून कृषी उत्पादनांच्या वाढीसाठी नाविण्यपुर्ण योजना राबविण्यास सुरूवात केली. सन 1960 मध्ये उत्पादन अल्प असल्यामुळे अन्नधान्याचा मोठया प्रमाणावर तुटवडा भासत होता.

त्यामुळे मोठ्या प्रमाणात अन्नधान्याची आयात करावी लागत होती. त्याच वेळी अमेरिकेने अन्नधान्य आयातीवर बंदी घातली. या सर्व समस्यांना समर्थपणे तोंड देण्यासाठी डॉ.एम.एस.स्वामिनाथन, सी. सुब्रहयण्यम आणि बी. शिवरामन या तज्ञांचा एक कार्यगट निर्माण केला गेला. या कार्यगटाने केलेल्या शिफारशी तात्काळ भारत सरकारने लागू केल्या गेल्या. कृषीसंबंधी विविध योजना सुरू केल्या गेल्या. या योजनांमुळे कृषी क्षेत्रात जे अभुतपूर्व बदल घडून आले यालाच 'हरित क्रांती ' असे म्हटले जाते. उत्पादन वाढीचा हा प्रयत्न भारतीय कृषीच्या इतिहासात मैलाचा दगड ठरला. या पासूनच भारतीय कृषी क्षेत्राच्या विकासाला चालना मिळाली. जगात अशा प्रकारचा प्रयोग यशस्वीरित्या राबविणारा भारत हा प्रथम देश ठरला.

हरित क्रांती म्हणजे कृषी क्षेत्राच्या विकासासाठी लागू केलेले नवीन तंत्रज्ञान होय. हरित क्रांतीमुळे कृषी क्षेत्राचे पारंपरिक धोरण बदलले गेले. संकरित बियाणे, आधुनिक कृषी औजारे, रासायनिक खतांचा वापर,अत्याधुनिक तंत्रज्ञान या सर्वांमुळे उत्पादनात मोठया प्रमाणात वाढ झाली. हरित क्रांतीमुळे शेतक-यांचा शेतीकडे केवळ उदरनिर्वाहाचे साधन म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन बदलून व्यापारी होत गेला. हरित क्रांतीने भारतीय कृषी क्षेत्राचा कायापालट झाला.

३. सधन कृषी जिल्हा कार्यक्रम (IADP)

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात कृषी विकासासाठी अनेक कार्यक्रम राबविले गेले. सरकारने शेती आणि शेतकरी यांना कृषी विकासाचा केंद्रबिंदू मानून सन 1960 & 61 मध्ये प्राकृतिक आणि परिणामकारक स्वरूपाचा सधन कृषी जिल्हा कार्यक्रम सुरू केला. ही योजना लागू होताच जिल्हा हा घटक विचारात घेवून निरनिराळया राज्यातील सोळा जिल्हयांची निवड करण्यात आली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे शेतीची उत्पादकता वाढवून त्याचा प्रसार करणे तसेच शेतीतील नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्याची वृत्ती शेतक-यांत निर्माण करणे व कृषीतील संशोधनाला चालना देणे ही या योजनेची महत्त्वाची ध्येये होती.

संबंधित जिल्हयांतील उपलब्ध आर्थिक, तांत्रिक आणि प्रशासकीय संसाधनांचा योग्य पध्दतीने, कुशलतेने उपयोग करून शेती उत्पादनात त्वरीत वाढ घडवून आणणे हे या कार्यक्रमाचे तातडीचे उदिदष्टये होते. या कार्यक्रमाअंतर्गत प्रत्यक्ष शेतीशी संबंधित कामे व कृषी विकासास पुरक ठरणा-या कृषी व्यतिरिक्त कामांचाही अंतर्भाव होतो. या कार्यक्रमात सुधारित पध्दतीचा अवलंब प्रथम महत्त्वाच्या पीकांसाठी केला गेला. या योजनेमुळे जिल्हयांच्या उत्पादकतेत भरीव वाढ झालेली दिसून आली.

त्यानंतर सन 1965 मध्ये या कार्यक्रमाचा विस्तार करून सधन शेती क्षेत्र कार्यक्रम असे नामकरण करून ११४ जिल्हयांत हा कार्यक्रम पारंपरिक राबविला गेला. या कार्यक्रमांतर्गत विशिष्ट पीकांच्या उत्पादनावर लक्ष केंद्रीत करण्यात आहे. परंतु हा कार्यक्रम पारंपरिक बियाण्यांपर्यंत मर्यादित होता.

४. संकरित सुधारीत बी-बियाण्याचा कार्यक्रम (H.Y.V. Programme):

पुर्वी भारतात पेरणीसाठी बियाणे तयार करण्याचे काम शेतकरीच करीत असे. पीक तयार झाल्यानंतर त्यातील तेजदार व टपोरे बियाणे निवडून ते पूढील हंगामासाठी साठवले जात असे. या बियाण्यांच्या बाबतीत ते पेरल्यानंतर पीक पक्व होण्यास जास्त अवधी लागायचा, दर एकरी उत्पादन कमी असायचे, जास्त उंचीमुळे पीक वाकायचे, रासायनिक खतांना प्रतिसाद देत नसे, यामुळे पीक उत्पादनात घट होत होती. या सर्व अडचणींचा विचार करून भारतात संकरीत बियाण्यांवर संशोधन सुरू केले व सन 1966 मध्ये चांगले

पर्जन्यमान असणाऱ्या निवडक भागात या योजनेचा कार्यक्रमाचा शुभारंभ केला. भारतात मुख्यतः ज्वारी, बाजरी, धान, गहू आणि मका या पीकांचे संकरित वाण प्रचलित झाले आहे. सुरूवातीला मेक्सिको आणि तैवान येथून गव्हाच्या आणि फिलिपीन्स, पाकिस्तान, बांग्लादेशातून तांदळाच्या काही नवीन जाती आणल्या गेल्या व भारतात त्यावर संशोधन करून नवीन जातीच्या वाणांची निर्मिती केली गेली.

५. श्वेत क्रांती (White Revolution) :

भारतात कृषी व्यवसाय आणि पशुपालन व्यवसाय हे एकमकांना पूरक असे व्यवसाय आहेत. देशात दुग्ध उत्पादनामध्ये झपाटयाने वाढ करण्याच्या दृष्टीने केलेल्या प्रयत्नास श्वेतक्रांती असे नाव दिले गेले. या योजनेला सुरू करण्यासाठी शासनाने ऑपरेशन प्लड-१ ही योजना जुलै 1970 मध्ये सुरू केली. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात दहा राज्यांत राष्ट्रीय डेअरी विकास योजना कार्यान्वित करण्यात आली. मुंबई दिल्ली चेन्नई आणि कोलकत्ता या महानगरात ऑपरेशन प्लड - २ अंतर्गत इ.स. 1980 ते 85 च्या दरम्यान मदर डेअरी चालू करून दुभत्या जनावरांसाठी चा-याची पूर्तता आवश्यक चारा गहांची व्यवस्था, पशुरोग नियंत्रणासाठी संशोधन कार्य, दुधाचे प्रमाण वाढविण्याचे प्रयत्न डेअरी उदयोगाचा विकास, संकरित जातीची पैदास इत्यादी कार्यक्रम राबविले गेले. त्यानंतर ऑपरेशन प्लड- ३ 1985 &94 या योजनेत देशातील 250 जिल्हयांना लाभ झाला. ऑपरेशन प्लड ही योजना यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड आनंद, मानसिंह इंस्टिटयुट ऑफ ट्रेनिंग मेहसाना आणि जी. देसाई ट्रेनिंग इन्स्टिटयुट पालनपुर येथे प्रशिक्षण केंद्र स्थापन केले गेले. डेअरी विकासासाठी शासनाने टेक्नॉलॉजी मिशन ची सुरूवात करून आनंद मॉडेलवर आधारित समित्या स्थापन केल्या आहेत.

६. कापुस एकाधिकार खरेदी योजना :

कापुस उत्पादकाना योग्य भाव मिळावा या हेतुने महाराष्ट्र कच्चा कापुस अधिनियम, 1971 अन्वये महाराष्ट्रात ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेनुसार उत्पादकांनी कापूस दिल्यावर त्यांना हमीभाव दिला जातो. विक्रीनंतर नफा झाल्यास हमीभावाच्या 75 टक्के रक्कम बोनस म्हणुन दिली जाते. या योजनेच्या सुरूवातीपासून 1984 पर्यंत कापूस खरेदी व्यवहार मार्केटींग फेडरेशन तर्फे होत होता. तथापि 1984 नंतर या व्यवहाराची सुत्रे शासनाच्या वतीने महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाकडे सोपविण्यात आली.

७. जलसिंचन क्षेत्र विकास कार्यक्रम : (CADP)

भारत सरकारने उपलब्ध सिंचन क्षमतेचा पर्यायी वापर करण्यासाठी व शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी पाचव्या पंचवार्षिक योजनेत सन 1974 मध्ये हा कार्यक्रम लागू केला. सुरूवातीला हा कार्यक्रम ७१ जलसिंचन प्रकल्पांमध्ये राबविला गेला. नंतर 1988 &89 मध्ये देशातील मध्यम व मोठया आकाराच्या निवडक १३१ प्रकल्पांमध्ये राबविण्यात आला. सन 1998 & 99 मध्य 2195 दशलक्ष हेक्टरवर हा कार्यक्रम राबविला गेला. या योजनेवर 175.77 कोटी रूपये खर्च झाले.

८. राष्ट्रीय जल धोरण (National Water Policy-1987)

सप्टेंबर 1987 मध्ये भारतात राष्ट्रीय जल धोरण स्वीकारण्यात आले. यात भारत सरकारने जलसिंचन विषयक धोरणाच्या बहुतांश शिफारशी स्वीकारून त्यांची अंमलबजावणी केली गेली. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी सिंचन प्रकल्पांच्या पाणी वितरणाचे वेळापत्रक तयार करून शेतक-यांना पाणी वापराबाबत

प्रशिक्षण दिले गेले. तसेच लहान मोठया नदयांच्या जोडणीसाठी राज्या-राज्यांत सामजस्य निर्माण केले गेले. त्यासोबतच सिमांत व लघू शेतक-यांना जलसिंचनाच्या वापरास प्रेरीत केले गेले.

९. कमाल जमीन धारण मर्यादा (Celling Land Holding)

या योजनेअंतर्गत कृषी क्षेत्रातील मोठया प्रमाणावरील उत्पन्न आणि संपत्तीच्या वितरणातील असमानता दुर करण्याच्या हेतूने भारतात एका व्यक्तीकडे जास्तीत - जास्त किती जमीनीची मालकी असावी या संदर्भात धारण क्षेत्रावर मर्यादा घालवण्यात आल्या. त्यानुसार भारतीय नियोजन मंडळाने कमाल जमीन धारणा मर्यादा निश्चित करण्यासाठी एका कार्यमंडळाची नियुक्ती करून मर्यादिपेक्षा अतिरिक्त ठरणारी जमीन सरकार जमा करून तिचे भुमिहीन शेतमजुर, सिमांत व लघु शेतक-यांना वितरीत केली गेली. या कायदयाअंतर्गत सामाजिक समानता व त्यादवारे शेतीत कायमस्वरूपी सुधारणा करून कृषी उत्पादनात वाढ हे तत्त्व स्वीकारले गेले होते.

१०.धारण क्षेत्राचे एकत्रिकरण (Consolidation of land Holdings)

या योजनेअंतर्गत लहान-लहान तुकडयांत विभागल्या गेलेल्या शेत जमिनीचे एकत्रिकरण करून आर्थिकदृष्टया किफायतशिर धारण क्षेत्र निर्माण केले गेले. या योजनेला पंजाब राज्यात सर्वात जास्त प्रतिसाद मिळाला. तसेच हरियाणा, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात ही योजना यशस्वी झाली तर पश्चिम बंगाल व आसाम राज्यात ही योजनाच राबविली गेली नाही.

११. पिवळी क्रांती(yellow Revolution):

अन्नधान्याच्या उत्पादनाच्या बाबतीत हरितक्रांती यशस्वी झाल्यानंतर तेलबिया पीकांच्या उत्पादन वाढीसाठी 'पिवळी क्रांती ' ही योजना राबविली केली. तेलबिया उत्पादनाच्या बाबतीत देशाला स्वयंपूर्ण करणे आणि खादयतेलाच्या बाबतीत देशाला स्वावलंब बनविणे या उदिदष्टांना डोळयासमोर ठेवून या योजनेची आखणी केली गेली. ही योजना २३ राज्यांतील ३३७ जिल्हयांत राबविली गेली. तेलबिया पीकांत भुईमुग, तीळ, सोयाबिन, सुर्यफुल, मोहरी या पीकांचा समावेश केला गेला. या योजनेमुळे तेलबियां पीकांच्या उत्पादनात दर हेक्टरी सरासरी ४०० ते ५०० किलोची वाढ झाली. तसेच तेलबिया लागवडी खालील क्षेत्रातही १० दशलक्ष हेक्टर पर्यंत वाढ झाली. परंतू काही राज्यांचा अपवाद वगळता या योजनेला पाहिजे तसे यश मिळाले नाही. म्हणुन या योजनेने तेलबियः पीकांच्या लागवडीस शेतक-यांस प्रोतसाहित केले.

१२.किसान क्रेडीट कार्ड योजना(KCCS) :

ग्रामीण भागातील शेतक-यांना कृषी उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी प्राधान्य क्रमाने कर्ज उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. ही योजना संपुर्ण भारतात सहकारी आणि व्यापारी बॅंकाच्या सहकार्याने सन 1998 & 99 मध्ये सुरू करण्यात आली. या योजनेदवारे शेतक-यांना बॅंकामार्फत पुरेसे आणि वेळेवर कर्ज उपलब्ध करून देवून त्यांची आपात्कालीन कर्जाची गरज झटपट भागवली जाते. या योजनेचे मुख्य वैशिष्टय असे आहे की, वाढीव कर्जाची गरज भासत असेल तर याबाबत बॅंका सकारात्मक विचार करतात तसेच नैसर्गिक आपत्तीत पीकांचे नुकसान झाल्यास कर्जाच्या परतफेडीत फेरबदल करून कर्जाचे पुनर्निर्धारण केले जाते. ही योजना अल्प काळात प्रचंड प्रमाणात यशस्वी झाली.

१३.राष्ट्रीय कृषी धोरण - २००० :

1990 च्या दशकात अन्नधान्य सुरक्षिततेत घट झाली तसेच कृषी वध्दी दरात सुध्दा घट आढळून आली. कमी उत्पादकतेमुळे कृषी मालाच्या किंमतीत सतत उतार-चढाव होवू लागले. त्यामुळे कृषी व्यवसाय फायदेशीर

नाही असे वाटून अनेक शेतकरी इतर व्यवसायांकडे वळू लागले. ग्रामीण भागातून सातत्याने स्थलांतरात वाढ झाली. पूर्वीच्या 'उत्तम शेती,मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी' या धोरणेला तडा जावून कृषी व्यवसाय कनिष्ठ ठरवला गेला. तेव्हा मात्र शासनाच्या असे लक्षात आले की, 1991 च्या उदारीकरणाच्या प्रक्रियेत कृषी व्यावसाय टिकाव धरु शकत नाही. त्यावेळेस तत्कालीन कृषी मंत्री नितीशकुमार यांनी 28 जुलै 2000 रोजी लोकसभेत राष्ट्रीय कृषी धोरण जाहीर केले.

या कृषी धोरणात कृषीवर आधारीत घटकांचा विचार केला गेला आहे. म्हणुन या धोरणास इंद्रधनुष्य क्रांती असे म्हटले जाते. देशातील जनतेला खाद्यान्न सुरक्षितता आणि पोषक आहार उपलब्ध करून देणे. कृषी क्षेत्रांतुन औदयोगिक क्षेत्राला कच्च्या माल पुरविणे कृषी धोरणत कृषी उत्पादकता वाढीत सातत्य टिकवणे हे या योजनेचे हेतू होते. म्हणून नव्या राष्ट्रीय कृषी धोरणात कृषी उत्पादनाचा वार्षिक वृध्दीदर ४ टक्के साध्य करावा असे ठरविले गेले. त्यासाठी अतिरिक्त निधीचीही व्यवस्था यात केली गेलेली आढळून येते. तसेच या धोरणात तळागाळातील अल्पभूधारक शेतक-यांचा सुध्दा समतेने विकास झाला पाहिजे असे मत मांडले गेले.

१४.सधन कापूस विकास कार्यक्रम :

केंद्र शासन पुरस्कत योजना असून या योजनेचा खर्च केंद्र शासन व राज्य शासन 75:25 या प्रमाणात करतात. उत्कष्ट प्रतीच्या सुधारीत आणि निर्यातीस योग्य अशा कापसाची उत्पादन क्षमता व प्रत्यक्ष उत्पादन वाढविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश होता

१५.उस उत्पादनाचा विशेष कार्यक्रमः

साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात उसाच्या सुधारित जाती, खत वापर इत्यांदींचे प्रात्याक्षिके प्रमाणित बियाण्याच्या वापरास उत्तेजन ट्रॅक्टर खरेदीसाठी अनुदान उपक्रम राबविले गेले.शेतजमीनीची उत्पादकता टिकून रहावी म्हणून उसाची मळी शेतक-यांना सेंद्रीय खत म्हणून नाममात्र खर्चात पुरविली

१६.पीक विमा योजना :

डॉ.वि.म.दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीने पथदर्शक पीक विमा योजना तयार केली. केंद्र शसन पुरस्कृत ही पीक विमा योजना सन १९८१ ते १९८५ या काळात महाराष्ट्र राज्याम पथदर्शक तत्वावर कार्यन्वित करण्यात आली होती. सन १९८५. १९८६ पासून ही योजनेला सर्वकष पीक विमा योजनेचे स्वरुप देण्यात आले.या योजनेचे स्वरुप पिकासाठी घेतलेल्या कर्जाचा विमा असून शेतक-यांना काही कारणास्तव उत्पादन कमी झाले तर त्यांचे आर्थिक नुकसान होउ नये व त्यांना संरक्षण मिळावे हा या योजनेचा उदेदश आहे.

१७. केळी पीक विमा योजना :

केळी हे महाराष्ट्रातील महत्वाचे व्यापारी पीक आहे. नैसर्गिक आपत्ती व हवामानातील प्रतिकूल घटकाचा परिणाम केळीच्या उत्पादनावर विपरित परिणाम होत असतो.अशा परिस्थितीत होणा-या नुकसानीपासून संरक्षण राज्यात केळीसाठी हवामान आधारित पीक विमा योजना कार्यान्वित करण्यात आली. शासनाने निश्चित केलेलत्या निकषानुसार हवामान धोक्याचे मोजमाप स्वयंचलित हवामान केंद्रामार्फत होते व ठरलेला निकष नोंदविला गेल्यास शेतक-यास नुकसान भरपाई मिळते.

१८. राष्ट्रीय कृषी पीक विमा योजना :

सन 1999 & 2000 पासून ही योजना राज्यात व देशात राबविली जाते.पीक तारणावर कर्ज घेणा-या शेतक-याला ही योजना सक्तीची आहे. या योजनेत अल्प भूधारक व अत्यल्प भू-धारक शेतक-यांना विम्याच्या हप्त्यात ५० टक्के अनुदान दिले जाते.

१९. किमान आधारभूत किंमत योजना :

नैसर्गिक आपत्ती व व्यापारी वर्ग देत असलेल्या कमी किंमती पासून शेतक-याच्या आर्थिक हिताचे संरक्षण व्हावे म्हणून केंद्र शासन काही निवडक पिकासाठी किमान आधारभूत किंमत जाहीर करते.या अंर्तगत शेतक-याच्या शेतमालाची खरेदी महाराष्ट्र राज्य पणन सहकारी संघ, राष्ट्रीय कृषी सहकारी पणन महासंघ आणि महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक महासंघ यांच्या मार्फत केली जाते.

२०. **कृषी संजीवनी योजना २०११ :**

वीज दरात मोठी सवलत देण्यासाठी व थकलेले वीज देयके या शेतक-यांचा समस्येतून मार्ग काढण्यासाठी राज्य शासनाने शेतक-यासाठी कृषी संजीवनी योजना २०११ लागू केली.

निष्कर्ष :

कृषी क्षेत्रातील नवीन शोध विकसित आणि विकसनशील देश या दोघातील अनुभव हेच दर्शवतात की, तंत्रज्ञानाचे वापरकर्ते वृध्दीशील शोधामुळे तंत्रज्ञान व उत्पादकतेत सुधारणा घडवुन आणण्यात महत्वाची भुमिका बजावतात. कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाची जोड लावल्याने शेतकरी नाविन्यपुर्ण शोध लावून कृषी विकासात योगदान देवू शकतात.

यासाठी शेतकरी नेत्याचे नाविन्य पुर्ण प्रयत्न आणि शेतकरी समुदायाकडुन तंत्रज्ञान हस्तांतरण, सेंद्रीय शेती वैविध्यकरण, पोषण सुरक्षेसाठी मागणीचा आकृतीबंध बदलणे यांना प्रतीसाद मिळत आहे. शेती व्यवसायासाठी यशस्वी खाजगी उपक्रम ओळखून कृषी विकासात शेतक-यांना सहभागी करून घेण्यासाठी प्रचंड वाव असून शेतक-यांनी असे उपक्रम सुरू केले आहे. त्यामुळे सार्वजनिक धोरणाव्दारे कृषी क्षेत्राचा शाश्वत विकास होत आहे.

संदर्भ

१. भारतीय अर्थव्यवस्था डॉ.देसाई व डॉ.भालेराव,संप्टेंबर,२००४ निराली प्रकाशन,पुणे
२. भारतीय अर्थव्यवस्था डॉ.राजेंद्र रसाळ,जानेवारी २०१० सक्सेस प्रकाशन,पुणे
३. Indian Economy-Datta and Sundaram 2018 S.Chand Publication New Delhi
४. योजना मासिक, जानेवारी २०२०